2915

# महाराष्ट्र शासन

क्र.विसअताप्र २०१६/प्र.क्र.१७६/पंरा४
ग्रामविकास व जलसंधारण विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई -४०० ००१.
दिनांक : ११ नोव्हेंबर, २०१६.

दुरध्वनी क्रमांक ०२२- २२०१७१०६
E mail - sopr4.rdd-mh@nic.in

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व

विषय- ग्रामपंचायतीकडील हस्तांतरीत स्थावर मालमत्तांच्या ग्रामपंचायत अभिलेख व महसूली अभिलेख यांमध्ये नोंदी घेणेबाबत.

संदर्भ- १. शासन निर्णय क्र. व्हीपीएम १०८६/प्र.क्र.२२१३/२२, दि. २२ ऑक्टोबर, १९८६
२. शासन निर्णय क्र. भूमापन १०८६/६८/४९६६, दि. ०४ नोव्हेंबर, १९८७

महोदय,

संदर्भिय शासन निर्णयांचे कृपया अवलोकन व्हावे.

ग्रामपंचायतीकडे विहीत पद्धतीने हस्तांतरण (विक्री/गहाण/बक्षीस/मोबदला/भाडेपट्टा) करण्यात येणाऱ्या स्थावर मालमत्तांच्या ग्रामपंचायतीच्या अभिलेख्यांत व त्याप्रमाणे महसूल विभागाच्या अभिलेख्यात आवश्यक नोंदी/फेरफार करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

तरी, ग्रामपंचायतींकडे विहीत पद्धतीने हस्तांतरण करण्यात येणाऱ्या स्थावर मालमत्तांच्या ग्रामपंचायतीच्या अभिलेख्यांत व त्याप्रमाणे महसूल विभागाच्या अभिलेख्यात आवश्यक नोंदी/फेरफार करण्याची कार्यवाही ग्रामपंचायतीने करणे आवश्यक आहे. त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्याच्या सूचना आपल्या अधिनस्त सर्व अधिकारी/कर्मचारी व ग्रामपंचायती यांना देण्यात याव्यात.

आपला

(संजय बनकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

ISSUED
११/११/१६

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी ग्रामीण रस्ते व ग्रामीण पाऊलवाट नव्याने बांधल्यानंतर त्याची माहिती महसूल खात्याच्या अधिका-यांना नकाशा सुधारण्यासाठी देण्याबाबत ...

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग,

शासन निर्णय क्र. व्हीपीएम १०८६/प्र.क्र. २२१३/२२,

मंत्रालय, मुंबई - ३२. दिनांक : २२ ऑक्टोबर १९८६.

शासन निर्णय :-

जे जुने रस्ते किंवा पाऊलवाटा पूर्वीपासून अस्तित्वात आहेत, ते गावाच्या नकाशावर दाखविण्यात येतात. परंतु जिल्हा परिषदा व किंवा पंचायत समित्या यांनी नवीन रस्ते बांधल्यानंतर काही वेळा ते रस्ते किंवा पाऊलवाटा नकाशावर दाखविलेले नसतात. याबाबत शासनाच्या असे निदर्शनास आले की, या रस्त्यांची किंवा पाऊलवाटांची माहिती संबंधीत अधिकाऱ्यांनी महसूल खात्याच्या अधिका-यांना दिलेली नसते. त्यामुळे शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, जिल्हा परिषदा किंवा पंचायत समित्या त्यांच्या अधिकाऱ्यांमध्ये जेव्हा जेव्हा नवीन ग्रामीण रस्ते किंवा पाऊलवाटा बांधतील त्यावेळी अशा रस्त्यांची किंवा पाऊलवाटांची माहिती त्यांनी जिल्ह्याच्या, तालुक्याच्या व गावाच्या नकाशावर दाखविण्यासाठी महसूल खात्याच्या संबंधीत अधिका-यांना वेळोवेळी पाठवावी.

२. वरील शासन निर्णय महसूल व वन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ वृ. श्री. कुलकर्णी ]

उप सचिव.

--२/-

प्रत :-

१] सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

२] सर्व जिल्हाधिकारी,

३] सर्व विभागीय आयुक्त,

४] महसूल व वन विभाग,

५] सार्वजनिक बांधकाम विभाग,

६] कार्यासन क्र. ३१, ग्राम विकास विभाग,

७] निवडक नस्ती, का. क्र. २२, ग्राम विकास विभाग.

महसूल शाखा

विषय : ग्रामीण भागातील ग्रामीण रस्ते, हद्दीचे ग्रामीण रस्ते ग्रामीण गाडीमार्ग, पायमार्ग, शेतावर जाण्याचे पायमार्ग गाडीमार्ग या बाबत नकाशे अद्ययावत ठेवून त्यावरील अतिक्रमण होणार नाही याबद्दल करावयाची कार्यवाही.

जिल्हाधिकारी कार्यालय
सातारा
24 NOV 1987
शाखा
अ. चि. चि. अ. चि. जिल्हाधिकारी

महाराष्ट्र शासन,
क्र : भूमापन-१०८६/६८/४९६६/ ल-१,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : 4 NOV 1987

वाचा : १] शासनाकडील महसूल व वन विभाग क्र. ठराव क्र. १/प्र. क्र. ४९७७/ल-१ दिनांक ९.१०.१९८६ व १८.११.१९८६.

२] शासनाकडील, महसूल व वन विभाग पत्र क्र. भूमापन-१०८६/६८/४९६६/ ल-१, दिनांक २७.११.१९८६.

३] महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग निर्णय क्र. व्हीपीएम-१०८६/प्र. क्र. २२१३/ २२, दिनांक २२.१०.८६.

## शासन निर्णय

ग्रामीण विभागात उपयोगात असलेले विविध प्रकारचे रस्ते, गाडीवाटा, पायऊलवाटा यांचे प्रकार खाली दिल्याप्रमाणे आहेत :

१] ग्रामीण रस्ते [एका गावाहून दुसऱ्या गावास जाणारे ]

२] हद्दीचे ग्रामीण रस्ते [ एका गावाहून दुसऱ्या गावास जाणारे]

३] ग्रामीण गाडीमार्ग [पोटखराब][एका गावाहून दुसऱ्या गावास जाणारे]

४] पायमार्ग [पोटखराब] [एका गावाहून दुसऱ्या गावास जाणारे ]

५] शेतावर जाण्याचे पायमार्ग व गाडीमार्ग.

२. राज्यात ज्यावेळी भूमापनाचे काम पूर्ण करून ग्राम नकाशे तयार करण्यात आले त्यावेळी प्रचलित असलेल्या वरील अ. नं. १ ते २ मध्ये नमूद केलेले रस्ते मूळ भूमापनाचे नकाशामध्ये मोजणी करून दाखविलेले आहेत. वर नमूद केलेले अ. नं. १ ते २ बहुतांशी रस्ते हे हद्दीचे रस्ते म्हणून दाखल केलेले असून ते भारीव हद्दीनी नकाशात दाखविले आहेत व ह्या रस्त्यांची जमीन कोणत्याही भूमापन क्रमांकामध्ये [लगत भूमापन क्रमांकात] समाविष्ट केलेली नाही अशा रस्त्यांची रूंदी एकसारखी नसून वेगवेगळी आहे व ती त्यावेळी मोजली असून ती भूमि अभिलेखात नमूद केली आहे.

३. अ. क्र. ३ चे रस्ते गावचे नकाशात तुटक दुबार रेषेने दाखविलेले आहेत असा रस्त्याचे क्षेत्र ते ज्या भूमापन क्रमांकातून जात आहेत त्या भूमापन क्रमांकात समाविष्ट आहे व अशा रस्त्यांची रूंदी १६½ ते २१ फूट पर्यंत धरलेली असून त्याच्या तपशील सदर नंबरमध्ये पोटखराब क्षेत्राचा विचार करताना प्रतिबुकामध्ये नमूद केलेला आहे.

क्र. मा. प.

९३।५



४. अ.क्र.४ चे पायमार्ग हे गावचे नकाशात एका तुटक रेषोने दर्शविलेले आहेत व अशा मार्गाचे क्षेत्र सदर मार्ग ज्या भूमापन क्रमांकातून जात आहे त्या भूमापन क्रमांकात समाविष्ट आहे व अशा पायमार्गाची रुंदी ८ १/२ फूट असून त्याप्रमाणे पोटखराब सदर भूमापन क्रमांकात दिलेले आहे. जे मार्ग पोटखराब आहेत असे मार्ग बंद झालेस त्या धारकांना बंद पडलेल्या मार्गाची जमीन रस्त्याचे हक्क जिल्हाधिकारी यांनी कमी केले नंतर परत जमीन कसण्यास मागणेचा हक्क आहे.

५. अ.क्र.५ चे प्रकारचे मार्ग हे शेतावर मशागतीस जाण्याचे, शेतमलाचे ने-आण करण्याचे मार्ग आहेत. अशा मार्गाची नोंद भूमापनाचे वेळी भूमि अभिलेखात केलेली नाही. तथापि, अशा रस्त्यांचे हक्काबाबत वाद निर्माण झाल्यास त्याबाबत चौकशी करून निर्णय देण्याचे अधिकार महाराष्ट्र जमीन महसूल कायदा १९६६ कलम १४३ अन्वये तहसिलदार यांना देण्यात आलेले आहेत. सबब, अशा शेतावर जाणेचे मार्गाचे हक्काबाबत वाद निर्माण झाल्यास संबंधितांना तहसिलदार यांचेकडे अर्ज करुन दाद मागता येईल. अशा शेतावर जाणा-या मार्गाची भूमापनाचेवेळी मोजणी केलेली नसल्यामुळे अशा रस्त्यांचे-बाबत भूमापन अभिलेख उपलब्ध नसल्यामुळे अशा रस्त्यांची मोजणी भूमि अभिलेख विभागाकडून करता येणार नाहीत. व त्यांच्या हद्दी निश्चित करुन देता येणार नाहीत. शेतावर जाण्यायेण्यासाठी असलेले मार्गाची मोजणी करून नकाशात ते दाखविण्याबाबत मोजणीचे प्रचलित नियमात तरतूद नाही. तसेच, कलम १४३ मध्ये सदर कामी केलेली तरतुद विचारात घेता असे रस्ते मोजण्याची मुळीच आवश्यकता नाही.

६. वर नमूद केलेले अ.नं.१ ते २ हया वर्गात नमूद केलेले रस्ते हे जमीन महसूल कायदा कलम २० मधील तरतुदीनुसार शासनाचे मालकीचे आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल कायदा १९६६ कलम १४२ व महाराष्ट्र जमीन महसूल हद्दी व हद्दीच्या निशाण्या नियम १९६९ मधील नियम १०[१] मधील परंतुकमध्ये नमूद केल्या-नुसार ज्या भूमापन क्रमांकाचे लगत शासनाच्या जमिनी आहेत अशा जमिनींचे हद्दीचे निशाण्यांचे परिरक्षण व दुरुस्तीची जबाबदारी ही कायद्यातील तरतुदी-प्रमाणे लगतचे भूमापन क्रमांकाचे धारकावर ठेवलेली आहे. अशा परिस्थितीत भूमापनाचे सीमेवरील हद्दी व हद्दींच्या निशाण्या नष्ट करुन जर एखादे धारकाने रस्त्यात अतिक्रमण केले असेल तर महसूल अधिका-यांनी अशा अतिक्रमण करणा-या धारकावर महाराष्ट्र जमीन महसूल कायद्यातील कलम १४२, ५३ मधील तरतुदीप्रमाणे आवश्यक ती कारवाई तातडीने करणे जरुर आहे व अतिक्रमण काढून टाकणे आवश्यक आहे.

७. ग्रामीण रस्ते यांची देखभाल व परिरक्षणाचे काम हे जिल्हा परिषदांचे बांधकाम विभागाकडून केले जाते. व हद्दीचे रस्ते [पाणंदा वगैरे] यांची देखभाल व परिरक्षण ही कामे ग्रामपंचायतीचे अखत्यारित येतात. जिल्हा परिषदा व ग्रामपंचायत रस्त्यावरील अतिक्रमण आढळून आल्यास ते काढून टाकण्याचे अधिकार मुंबई ग्रामपंचायत कायदा १९५८ चे कलम ५३[२] अन्वये ग्रामपंचायतीना प्रदान केलेले आहेत व कलम ५३[२अ] अन्वये अशा प्रकारची अतिक्रमणे हटविण्याची कारवाई ग्रामपंचायतीने न केल्यास अशा प्रकरणी अतिक्रमणे हटविण्याचे अधिकार ते जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहे. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांना कारवाई करणे शक्य आहे.

८. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना वर नमूद केलेल्या ५ प्रकारच्या ग्रामीण रस्त्यांवर कोणत्याही तऱ्हेचे अतिक्रमण होणार नाही व त्यामुळे ग्रामीण विभागातील होणाऱ्या अतिक्रमणांवर जरूर ती कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात येत आहेत. तहसिलदार यांना त्यांच्या तालुक्यातील अशा तऱ्हेच्या ग्रामीण रस्त्यांवर अतिक्रमण आढळून आल्यास त्याबाबत त्वरित कार्यवाही करण्याबाबत जबाबदारी सोपविण्यात यावी.

९. ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. व्हीपीएम-१०८६/२२१३/२२, दिनांक २२.१०.१९८६ प्रमाणे जिल्हा परिषदा किंवा ग्रामपंचायत समित्या यांच्याकडून नवीन ग्रामीण रस्ते, पाऊलवाटा याबाबतची माहिती प्राप्त होताच त्या गावच्या नकाशावर दाखविण्यासाठी जिल्हा निरिक्षक भूमि अभिलेख यांनी जरूर ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१०. या सूचनेची अंमलबजावणी काटेकोरपणे केली जाईल याची सर्वांनी दक्षता ठेवावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[वि. बा. जाधव]
अवर सचिव, महसूल व वन विभाग.

प्रत,

सर्व आयुक्त,
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व उपसंचालक भूमि अभिलेख,
सर्व तहसिलदार/सर्व जिल्हाधिकारी परिषदांचे कार्यालयीन अधिकारी,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
ग्राम विकास विभाग,
निवड नस्ती कक्ष ल-१ कार्यासन, महसूल व वन विभाग.

सी. एल. के.